# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.06.2026** **वार:बुधवार**

1. जी-सात परिषदेत नवीन भागेदारी आणि आंतरराष्ट्रीय एकजुटीची पुनरस्थापनेवर भारताची महत्वाच्या देशांसोबत चर्चा. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रंप यांची भेट
2. महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी 733 कोटी रुपयांच्या खर्चाला केंद्राची मान्यता
3. महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
4. महिला बचत गटांना एक हेक्टर शासकीय जमीन पाच वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देण्याचा राज्य सरकारचा निर्णय
5. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आज पुणे दौऱ्यावर, पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आणि
6. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषध विक्रीवर बंदी

**मोदी-जी-7 शिखर परिषद**

फ्रान्स मधील एवीयन शहरात सुरू असलेल्या 52व्या जी-सात परिषदेत जगभरातील प्रमुख देशांचे नेते, महत्वाच्या आंतरराष्ट्रीय आव्हानांवर चर्चा करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी G7 शिखर परिषदेत ‘नवीन भागादारी आणि आंतरराष्ट्रीय एकजुटीची पुनरस्थापना’ या विषयावरील सत्राला संबोधित केलं. या सत्रा दरम्यान पंतप्रधानांनी, आंतरराष्ट्रीय भागीदारी निर्माण करण्यासाठी परस्पर विश्वास महत्वाचा असल्याच्या मुद्द्यावर जोर दिला. भारतानं नेहमीच मानवतेला प्रथम प्राधान्य देण्याचा दृष्टिकोन स्वीकारला आहे असंही त्यानी सांगितलं.

भारताची आंतरराष्ट्रीय भागीदारीची दृष्टी 'वसुधैव कुटुंबकम' या कालातीत सूत्रावर आधारित आहे असंही त्यांनी सांगितलं. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांनी कॅनडा आणि ब्रिटनच्या पंतप्रधानांशी तसंच संयुक्त अरब अमिरातीच्या अध्यक्षांशी द्विपक्षीय चर्चा केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर आज बैठक नियोजित आहे.

जी सात देशांनी, भारतासह अनेक भागीदार देशांच्या सहकार्यानं जागतिक आरोग्य आणि विकास सहकार्य मजबूत करण्यासाठी अनेक उपक्रमांची घोषणा केली. इबोलाच्या दुर्मिळ प्रकारावरील लस, निदान आणि उपचारांच्या विकासासाठी पाठिंबा आणि कर्करोगाविरुद्धच्या जागतिक लढ्याला गती देण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा जी सात देशांनी पुनरुच्चार केला.

**पोलिस दल**

महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र सरकारने 733 कोटी 28 लाख रुपये खर्चाच्या योजनेला मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाज माध्यमावरून ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत 60 टक्के निधी केंद्र सरकार आणि 40 टक्के निधी राज्य सरकार उपलब्ध करून देणार आहे. महाराष्ट्र पोलिस दल अधिक आधुनिक, सक्षम आणि तंत्रज्ञानसज्ज होण्यास या निधीमुळे मदत होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले.

**मंत्रिमंडळ निर्णय**

राज्याच्या ग्रामीण भागातल्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी आणि कायमस्वरुपी उपाययोजनांवर भर देणाऱ्या 'महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरणाला' काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विविध योजनांचं एकत्रिकरण करून हे धोरण राबवलं जाणार आहे. स्वच्छ, निर्जंतुक पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठीचं नियोजन या धोरणात आहे.
विकसित भारत जी रामजी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात बदल करणारा अध्यादेश जारी करायलाही मंत्रीमंडळानं काल मान्यता दिली. याशिवाय ड्रोन आणि तत्सम उपकरणांच्या निर्मितीच्या धोरणालाही मान्यता देण्यात आली.

**महिला बचत गट-जमीन**

राज्यातील महिला बचत गटांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्याच्या महसूल विभागानं महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रत्येक पात्र महिला बचत गटाला 5 वर्षांच्या भाडेतत्त्वावर 1 हेक्टर म्हणजे अडीच एकर शासकीय जमीन उपलब्ध करून दिली जाणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपूरमध्ये ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत बचत गटांना चारा लागवड, बांबू लागवड आणि चराऊ जमीन विकासासाठी एक लाख रुपयांचं अनुदान देखील दिलं जाणार आहे.

**पुणे-शिर्डी रेल्वे**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण तसंच रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आज एक दिवसाच्या पुणे दौऱ्यावर येणार आहेत. पुणे आणि साईनगर शिर्डी दरम्यान आजपासून सुरु होणाऱ्या थेट दैनंदिन रेल्वे सेवेला वैष्णव, पुणे रेल्वे स्थानकावरून हिरवा झेंडा दाखवणार आहेत. पुणे, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसंच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वेसेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आजच्या पुणे दौऱ्यात अश्विनी वैष्णव हडपसर रेल्वे स्थानकालाही भेट देणार आहेत.

तत्पूर्वी ते, रांजणगाव इथं जबील कंपनी, इको बॉक्स इंडस्ट्रियल पार्क आणि रांजणगाव गणपती एम.आय. डी. सी. ला भेट देणार आहेत. जबील कंपनीत सुरू होणाऱ्या अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उत्पादन केंद्राचं उद्घाटन होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

**कफ सिरप**

केंद्र सरकारनं देशभरातील औषध विक्रीच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करत लहान गावांमध्ये कफ सिरप विक्रीसाठी उपलब्ध असलेली विशेष सवलत रद्द केली आहे. आता डॉक्टरच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषधासह कोणत्याही प्रकारच्या सिरपची थेट विक्री करता येणार नाही.
कफ सिरपच्या वापरावर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे, संभाव्य गैरवापराला आळा घालणे आणि सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षेला बळकटी देणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**ऑलिव्ह-रिडले**

सागरी परिसंस्थेच्या संतुलनात समुद्री कासवांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. याबद्दल जनजागृतीसाठी 16 जूनला जागतिक समुद्री कासव दिन साजरा केला जातो. ऑलिव्ह रिडले हा यातला एक महत्त्वाचा प्रकार असून, या कासवांच्या संवर्धनात रत्नागिरी जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यंदाच्या हंगामात रत्नागिरी जिल्ह्यातून सर्वाधिक पिल्लं समुद्रात सोडण्यात आली. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**यंदाच्या हंगामात कोकणातल्या 56 किनाऱ्यांवर ऑलिव्ह रिडले कासवांच्या 1724 घरट्यांची नोंद झाली. त्यातून एक लाख आठ हजार 596 पिल्लांना यशस्वीरीत्या समुद्रात सोडण्यात आलं. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक 964 घरटी नोंदवली गेली आणि त्यातून सर्वाधिक 54 हजार 277 पिल्लं समुद्रात सोडण्यात आली.**

**रायगड जिल्ह्यात 22 घरट्यांमधून एक हजार 44, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात 738 घरट्यांमधून 53 हजार 325 पिल्लं समुद्रात सोडण्यात आली. यंदा रत्नागिरीतल्या वेळणेश्वर, वरवडे, नेवरे, ढोकमळे, पूर्णगड, सालदुरे अशा काही किनाऱ्यांवर कासवांची घरटी प्रथमच आढळली. ऑलिव्ह रिडले कासव वन्यजीव कायद्यानुसार संरक्षित प्राणी आहे. हे कासव मच्छिमारांच्या जाळ्यात सापडल्यास जाळं कापून त्यांना जीवदान देण्याकरिता कांदळवन कक्षाकडून नुकसानभरपाई दिली जाते. जखमी कासवांवर उपचारांसाठी किनारपट्टीवर उपचार केंद्रंही उभारण्यात आली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून कासव महोत्सवासारखे उपक्रम प्रभावीपणे राबवले जात आहेत. कासवमित्र, ग्रामस्थ, मच्छिमार, स्वयंसेवी संस्था आणि वन विभागाचा कांदळवन कक्ष यांच्या एकत्रित प्रयत्नांमधून हे यश प्राप्त झालं आहे.**
**आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**नीट-टेलिग्राम**

येत्या 21 जून 2026 रोजी होणाऱ्या 'नीट-युजी' फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं 22 तारखेपर्यंत देशात टेलिग्राम या सोशल मीडिया वेबसाइटच्या वापरावर निर्बंध लादले आहेत. आगामी परीक्षेचा पेपर विकण्याचा दावा करणारे बनावट आणि फसवे संदेश या ॲपवर झळकत आहेत; त्यामुळे एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं टेलिग्रामवर निर्बंध लादण्याची शिफारस केली होती. आगामी नीट यूजी परीक्षेचा पेपर फुटलेला नसून कुणीही या आमिषांना बळी पडू नये, असं एनटीएनं यापूर्वीच स्पष्ट केलं आहे.

**लातूर**

दरम्यान 'नीट-युजी' फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे. परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. राष्ट्रीय चाचणी संस्थेतर्फे जिल्ह्यातील २६ केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. विद्यार्थी आणि पालकांच्या मदतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**हवामान**

जूनच्या पहिल्या पंधरवड्यात राज्यात सरासरीच्या केवळ 26 टक्के पाऊस झाला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये असा सल्ला राज्य सरकारनं दिला आहे. मान्सूनला झालेला विलंब आणि धरणातील घटता पाणीसाठा, यांबाबत राज्य मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे.

दरम्यान येत्या दोन दिवसात विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.